# अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

**॥ एकच लक्ष 13 कोटी वृक्ष ॥**




महाराष्ट्र शासनाच्या सन २०१८ च्या पावसाळयामध्ये १३ कोटी वृक्ष लागवड योजनेच्या अंतर्गत अंबरनाथ नगरपरिषदेने दि.१ जुलै, २०१८ रोजीपासून वृक्ष लागवडीचा शुभारंभ केला.

नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सौ.मनिषा वाळेकर तसेच नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री.देविदास पवार यांचे शुभ हस्ते के.बी.रोड लगत असलेल्या चिखलोली येथील मलनि:स्सारण केंद्र या ठिकाणच्या मोकळया जागेवर वृक्षारोपण करुन शुभारंभ करण्यांत आला. सदर प्रसंगी नगरपरिषदेचे नगरसेवक निखिल वाळेकर, उपमुख्याधिकारी श्री.दिपक चव्हाण, नगरपरिषदेचे प्रकल्प अधिकारी राजेंद्र हवळ , नगरपरिषदेचे अभियंते श्री.राजेश तडवी, श्री.विशाल राठोड, श्री.विनोद राठोड, श्री.सुनिलकुमार जाधव, उद्यान विभाग प्रमुख श्री.प्रमोद परमाल तसेच इतर अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.





या वर्षी अंबरनाथ नगरपरिषदेमार्फत अंबरनाथ शहरामध्ये ११५०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यांत येणार आहे. सदर वृक्ष लागवड दि.१ जुलै २०१८ ते ३१ जुलै २०१८ या कालावधीत करण्यांत येणार आहे. याबाबत नगरपरिषदेचे सन्मा.नगरसेवक, शहरातील प्रतिष्ठित नागरिक, सेवाभावी संस्था, शाळा – कॉलेजचे शिक्षक-विद्यार्थी तसेच इतर सामाजिक संस्था, नागरिक यांच्या सहभागाने सदर वृक्ष लागवडीचा कार्यक्रम यशस्वी करण्यांत येणार आहे.

**सदर वृक्ष लागवडीमध्ये सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे.** अंबरनाथ नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये ११५०० वृक्षांच्या लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करणेकरीता तसेच वैश्विक उष्णतेमध्ये होणारी वाढ ( Global Warming ), हवामानातील बदल ( Climate Change ) यांची तिव्रता कमी करणेसाठी लोकप्रतिनिधी, नागरिक, सेवाभावी संस्था, शाळा-कॉलेज यांनी सहभागी होऊन जास्तीत जास्त झाडे लावून सदर योजना यशस्वी करणेस बहुमोल सहकार्य करावे.